# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

# मोड्यूल क्र.३८

## विषयाची रांगोळी उपक्रमातून विद्यार्थी विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका

## The Role of School Leadership in Student Development through Rangoli Activities of the Subject

**प्रस्तावना:**

कोविड-19 च्या महामारीने जगभरामध्ये हाहाकार माजवला. या संसर्गजन्य रोगाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी जगभरातून अनेक प्रयत्न केले गेले. याचाच एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून कोरोनाला रोखण्यासाठी अनेक देशांनी शिक्षणसंस्थासुद्धा बंद केल्या होत्या. 'युनेस्को'च्या अहवालानुसार एप्रिल २०२०मध्ये १८८ देशांत १५४ कोटी विद्यार्थी घरी बसले होते. भारतात १५ लाख शाळा बंद होत्या. त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी व ८९ लाख शिक्षक घरी बसले होते, तर उच्च शिक्षणात ५० हजार शिक्षणसंस्था बंद होत्या व ३.७० कोटी विद्यार्थी आणि १५ लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसले होते. ३० कोटी विद्यार्थ्यांनी रिकामेपणे घरी बसणे हा एक मोठी समस्या होती. करोनाची समस्या ही केवळ आरोग्याची समस्या नव्हती त्याला तर या संकटाला शैक्षणिक समस्यांची बाजू आहे, हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. 'युनेस्को'ने शाळाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांच्या समस्येवर तातडीने मार्ग काढण्याच्या सूचना आपल्या सभासद देशांना दिल्या होत्या . शिक्षणात आलेल्या या व्यत्ययाने मुलांना शिक्षण हक्कापासून वंचित राहावे लागत आहे, असे मत 'युनेस्को'ने नोंदविले होते. दूरशिक्षण, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, यू-ट्यूब, हॅगआउट, मल्टिमीडिया, मोबाइल फोन, ई-लायब्ररी, दूरदर्शन इ. माध्यमांतून अनेक देशांनी तातडीने, मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, म्हणून अनेक उपक्रम सुरू केले होते.

महाराष्ट्र, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था औरंगाबाद ,शिक्षण विभाग, जिल्हा परिषद व इतर शैक्षणिक संस्थांनी सुद्धा या काळात online माध्यमातून शिक्षण सुरु ठेवण्याचा प्रयत्न केला. यामध्ये whats app – स्वाध्याय, DIKSHA APP, ZOOM, GOOGLEMEET, YOUTUBE व READ TO ME सारख्या प्रभावी माध्यमांचा वापर करण्यात आला. ग्रामीण भागात पालकांचा मुख्य व्यवसाय हा शेती असल्याने येथील पालकांमध्ये ONLINE शिक्षणा बाबत जागरूकता नव्हती व आर्थिकदृष्ट्या त्यांना परवडणारे देखील नव्हते. ग्रामिण तसेच काही

जिल्हा परिषद व महानगर पालिकेचे 5 ते 10 टक्के विद्यार्थी सोडता बाकी विद्यार्थ्यांपर्यंत ONLINE शिक्षण पोहचू शकले नाही.

शाळा नियमित सुरु झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे अवधान शाळेत टिकवून ठेवणे अवघड झाल्याचे लक्षात आले. मुलांना पूर्ण वेळ वर्गात बसण्याची सवय कमी झाल्याचेही शिक्षक मुख्याध्यापक याच्या लक्षात आले. तसेच विद्यार्थी उपस्थितीचे प्रमाण कमी झाले. विद्यार्थी उपस्थिती वाढविणे व ती टिकविणे हे शिक्षकांसमोर एक मोठे आव्हान उभे राहिले. विद्यार्थी कोविड काळात पूर्णतः घरी असल्याने त्याचे खेळण्याचे, मनोरंजनाचे प्रमाण अधिक वाढले त्यामुळे त्याचे शालेय शिक्षणात लक्ष लागेना. विद्यार्थ्यांचे शिक्षण हे अधिक आकर्षक, आनंददायी, कृतीशील, भयमुक्त, तणावमुक्त व खेळीमेळीच्या वातावरणात कसे घेता येईल याचा विचार करण्यात आला व मुख्याध्यापकांनी रांगोळी रेखांकन हा उपक्रम सर्वान समोर मांडला. रांगोळी रेखाकन म्हणचे विषयाची रांगोळी हा विद्यार्थ्याची कलेच्या माध्यमातून शिक्षणातील गोडी वाढावी, शिक्षण हे तणावमुक्त व भयमुक्त होण्यासाठी व ते अधिक आनंददायी करण्यासाठी तसेच विद्यार्थ्याचा कृतियुक्त सहभाग अधिक वाढविण्यासाठी व शिकण्यात एक नाविन्यता आणण्यासाठी विषयाची रांगोळी ही संकल्पना प्रत्यक्षात आणली गेली. शिकण्यात नाविन्यता आणण्यासाठी विषयाची रांगोळी या संकल्पनेचा वर्गावर्गात वापर करण्यात आला आणि तो यशस्वी ठरला.

**सदर उपक्रमाची गरज का भासली ??**

कोरोनानंतर विद्यार्थ्यांना खालील अडचणी दिसून आल्या



## मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे:-

- कलेच्या माध्यमातून विषयातील संबोध / संकल्पना यांचे आकलन होण्यासाठी विषयाची रांगोळी ही संकल्पना समजून घेणे.
- विषयाची रांगोळी या उपक्रमातील कृतीतून विद्यार्थ्यांना अध्ययनाची संधी निर्माण करण्याबाबतची प्रक्रिया समजून घेणे.
- विषयाची रांगोळी या कृतीद्वारे या विद्यार्थ्यांना अध्ययनाची संधी निर्माण करण्याबाबतची प्रक्रिया शालेय नेतृत्वाने समजून घेणे .

## विषयाची रांगोळी संकल्पना:

विद्यार्थ्याची शिक्षणातील गोडी वाढावी, शिक्षण हे तणावमुक्त व भय मुक्त होण्यासाठी व ते अधिक आनंददायी करण्यासाठी तसेच विद्यार्थ्याचा कृतियुक्त सहभाग अधिक वाढविण्यासाठी व शिकण्यात एक नाविन्यता आणण्यासाठी विषयाची रांगोळी ही संकल्पना अस्तित्वात आली. कोरोना काळात झालेल्या शैक्षणिक नुकसानाची जाणीव लक्षात घेऊन मुलांना काहीतरी नावीन्यपूर्ण पद्धतीने तसेच कलेच्या माध्यमातून शिक्षणाची गोडी लावण्यासाठी या विषयाची रांगोळी या संकल्पनेची निर्मिती झाली.

कोरोना काळानंतर विषयाची रांगोळी ही संकल्पना शाळा मुख्याध्यापक व शिक्षक यांनी एकत्रितपणे विचार करून विद्यार्थी अध्ययनासाठी सुरू केलेली आहे. यात प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण करताना विद्यार्थ्यांच्या कृतीयुक्त सहभाग वाढविणे, नाविन्यपूर्ण कृती , जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग यावर भर दिला जातो. प्रत्येक विषयाचा एक घटक वर्गात पूर्ण शिकवून झाल्यानंतर त्यातील प्रमुख मुद्द्यानुरूप/आशयानुरूप/घटकानुरूप वर्गांच्या दाराजवळ रांगोळी काढली जाते. या रांगोळीला नावे दिली जातात. विद्यार्थी हा उपक्रम पूर्ण करतात. शिक्षक मार्गदर्शन करतात. रांगोळी काढताना घटकावर चर्चा होते, दृढीकरण होते, नियोजन मुले शिकतात, रांगोळी काढण्यासाठी एकमेकांना सहकार्य करतात, एका उपक्रमातून विद्यार्थ्यांचे अध्ययन तर होतेच इतर अनेक गुण विद्यार्थ्यांत यावेत यासाठी प्रयत्न केले जातात.

वर्गामध्ये अध्ययन अध्यापन सुरु असतांना पाठ्य घटकातील विषयनिहाय चित्रे. नकाशे तसेच काही संकल्पना, वर्णनपर माहिती याची चित्र रांगोळी काढता येऊ शकतात का यावर सुरुवातीला वर्गातील विद्यार्थ्यासोबत चर्चा करण्यात येते. विद्यार्थी चित्राच्या साह्याने विषय समजून घेण्याचा प्रयत्न करतात. त्याचा संबंध लावतात. व एक प्रकारे त्यांचे स्वयंअध्ययन होते. नंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या घटकावर आधारित संकल्पनेवर, चित्रावर आधारित काही विद्यार्थी रांगोळी काढतात. यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांना संधी कशी मिळेल याकडे शिक्षकाचे लक्ष असते. अर्थात सुलभक म्हणून शिक्षक कार्य करत असतात . दुसऱ्या दिवशी ज्या विषयाची रांगोळी काढायची त्यावर गटात शिक्षक चर्चा करतात त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी, गटचर्चा, नियोजन ,सहकार्य हे गुण आत्मसात होऊ लागते. विषयाची रांगोळी काढताना अध्ययन झालेला घटक रांगोळी स्वरूपात कसा मांडायचा त्यावर चर्चा होऊन विविध रंगसंगतीतून विषयाचे आकलन दिसून येते.

## संबोध आकलनात शालेय नेतृत्वासमोर असलेली आव्हाने.

1. अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुरु असताना विद्यार्थ्यांचे अवधान लवकर केंद्रित होत नाही.
2. शाळेत, वर्गात जास्त वेळ बसण्याची सवय राहिली नाही.
3. पूर्वी शिकलेले विस्मरण झाले.
4. विद्यार्थ्यांना विषयाचा, घटकाचा संबोध लवकर स्पष्ट होत नाही.
5. शिक्षक – विद्यार्थी याच्यातील आंतरक्रिया कमी झाली.
6. लिहिण्याची व वाचनाची गोडी कमी झाली.
7. विद्यार्थी अभ्यास करण्यास टाळाटाळ करतात.
8. कोविड – 19 मुळे कमी झालेला अध्ययनस्तर


## यशोगाथा

### जि. प. प्रा. शाळा गणोरी,

तालुका फुलंब्री,जिल्हा औरंगाबाद.

श्रीम.उत्कर्षा सुधाकर देशमुख,मुख्याध्यापक

औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील गणोरी गाव, जे फुलंब्री पासून 15 किलोमीटर अंतरावर असून लोकसंख्या 6230 ()2011 च्या जनगणनेनुसार) आहे. येथे जिल्हा परिषदेची जि. प. प्रा. शा. गणोरी इयत्ता 1 ली ते 4 थी ची शाळा आहे. शाळेचा पट 158 आहे व 6 शिक्षक आहेत. इयत्ता 1ली व 3 री च्या एक तुकडी व 2री व 4थी च्या दोन तुकड्या आहेत. 6 शिक्षक व 6 वर्ग आहेत. कोरोना काळानंतर शाळा सुरू झाल्या आणि शिक्षक व मुख्याध्यापकांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागले. त्यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी, त्यांना येणारा कंटाळा, शाळेत जास्त वेळ थांबावे न वाटणे, विषयाच्या शिकण्याकडे लक्ष केंद्रित होण्यात अडचण, संबोध संकल्पना समजण्यात अडचणी, यावर सर्वांनी बैठकांद्वारे चर्चा केली आणि त्यातून (Art integrated learning) कला एकात्मिक शिक्षण प्रक्रियेचा वापर करण्याचे ठरले .




विद्यार्थ्यांना कलेच्या माध्यमातून शिक्षण प्रक्रियेत समाविष्ट करण्यासाठी रांगोळ्या व चित्र यांचा वापर करण्याचे ठरले. त्यानुसार प्रत्येक वर्गात प्रत्येक दिवशी ज्या विषयाचा घटक पूर्ण होतो त्या घटकावर आधारित चित्र/रांगोळी विद्यार्थी गटात काढतात. रांगोळी आणि रंग मुलांना देण्यात येतात. सुरुवातीला विद्यार्थ्यांना बऱ्याच गोष्टी सांगाव्या लागत आता मात्र विद्यार्थी स्वतः (विशेषता चौथी) पाठ्यपुस्तकातील चित्र रंगसंगती पाहून चित्र रांगोळ्या काढतात. या उपक्रमातून अनेक गोष्टी साध्य करता आल्या. ज्या विद्यार्थी आणि शाळा विकासात पोषक आहेत.

## उपक्रमाची गरज व महत्त्व:

कोरोना काळात झालेल्या शैक्षणिक नुकसानाची जाणीव लक्षात घेऊन मुलांना काहीतरी नावीन्यपूर्ण पद्धतीने तसेच कलेच्या माध्यमातून शिक्षणाची गोडी लावण्यासाठी आम्ही सर्व शिक्षकांनी हा उपक्रम अमलात आणला. अध्ययन झालेल्या विषयाची रांगोळी काढताना विद्यार्थ्यांचे सहजतेने स्वयंअध्ययन होऊ लागले. स्वाभाविकच त्यातून मिळणारे ज्ञान चिरकाल स्मरणात राहील या उद्देशाने आम्ही या नाविन्यपूर्ण उपक्रमाला सुरुवात केली.

## उपक्रमाची उद्दिष्टे :

1. 100% विद्यार्थ्यांची उपस्थिती टिकविणे व त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवणे.
2. कलेच्या माध्यमातून विषयाच्या संबोधाचे आकलन घडवून आणणे.
3. विषयाची रांगोळी या कृतीद्वारे विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययन करण्याची संधी निर्माण करणे.
4. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी संबंधित उपक्रमाचा वापर करणे.
5. 100% विद्यार्थ्यांच्या सहभागातून शिक्षणाची गोडी निर्माण करणे.

## नियोजन व कार्यवाही:





जि. प. प्राथमीक शाळा गणोरी शाळेमध्ये इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे वर्ग आहेत व चालू शैक्षणिक वर्षाचा पट एकूण 159 आहे.covid-19च्या काळात ऑनलाईन प्रणालीद्वारे शिक्षण तर सुरू होते परंतु विद्यार्थ्यांतील शिक्षणाबद्दलची ओढ कमी कमी होत चालली होती. प्रत्यक्ष अध्ययन हे विद्यार्थी व शिक्षक यांच्या आंतरक्रिया द्वारेच अधिक प्रभावशाली होते. शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये एक अनामिक भीती तसेच अभ्यासाबाबत अनास्था दिसून आली. त्यातूनच ही समस्या कशा पद्धतीने सुरू व्हावी यावर आम्ही शिक्षकांनी चर्चा केली.

विद्यार्थ्यांच्या आवडीचा आणि जवळचा विषय म्हणजे कला याच कलेचा आधार घेऊन वर्गात अध्ययन झालेल्या पाठ्यपुस्तकातील घटकांचा विषयांची रांगोळी याद्वारे संबंध कसा जोडता येईल यावर विचार केला. यासाठी पाठ्यपुस्तकातील चित्रांचा उपयोग झाला. साहजिकच विषयाचे अध्ययन करीत असताना विद्यार्थी ते समजून घेण्यासाठी प्रयत्न करू लागले. दुसऱ्या दिवशी ज्या विषयाची रांगोळी काढायची त्यावर गटात चर्चा करीत केले त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी गटचर्चा नियोजन सहकार्य हे गुण

आत्मसात होऊ लागले. विषयाची रांगोळी काढताना अध्ययन झालेला घटक रांगोळी स्वरूपात कसा मांडायचा त्यावर चर्चा होऊन विविध रंगसंगतीतून विषयाचे आकलन दिसून आले. उदाहरणार्थ इयत्ता चौथी च्या आनंदाचे झाड ही रांगोळी या शेवग्याचे झाड त्यावरील विविध पक्षी पांढऱ्या रंगाचे घोस झाडाबाबतचा सकारात्मक दृष्टिकोन रांगोळी काढताना दिसून आला.

विषयाची रांगोळी काढण्यासाठी रांगोळी व रंग उपलब्ध करण्यात आले. विषयाची रांगोळी काढण्यासाठी विषय घटक आवश्यक मांडणी रंगसंगती या सर्व कृतींमध्ये विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते त्यामुळे त्यांचा आनंद वेगळाच होता. विषयाची रांगोळी काढण्याच्या उत्साहात पोटी उपस्थितीचे प्रमाणही वाढले. विद्यार्थ्यांचे उपक्रमातील सहभाग यावेळचे फोटो तसेच माहिती पालक वर्गांना व्हाट्सअप द्वारे शेअर केल्यामुळे पालकांचाही याबाबत उत्साह दिसून आला. यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात प्रभावी आंतरक्रिया साध्य होऊ लागली आणि उपस्थितीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले.



सदर उपक्रम हा विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण करणारा ठरला तसेच कला या विषयाच्या माध्यमातून गणित, मराठी, परिसरअभ्यास, कार्यानुभव व इंग्रजी या सर्व विषयांना जोडणारा ठरला. विद्यार्थी केंद्रित शिक्षणाला बळ दिले गेले. पालक शिक्षक विद्यार्थी यामध्ये अंतर क्रिया घडून येऊ लागली. उपक्रमाचा यशस्वी व चढता आलेख फक्त भविष्यातही हा उपक्रम सुरू ठेवून त्यात आवश्यक बदलांना स्वीकारत शिक्षणाच्या संधी मुलांना उपलब्ध करून देऊ. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक श्रीमती ए. एल.भस्मे, श्रीमती एस. एस. तिडके, श्रीमतीबी. के. दशपुत्रे, श्रीमती आर. आर. जोशी व श्री.के. ए.पवार यांचे सहकार्य लाभले.




**उपक्रमाविषयी जाणून घेताना डॉ. सुनिता चुग प्रोफेसर निपा, नवी**

## विद्यार्थ्यांबाबत दिसून आलेली फलनिष्पत्ती




**अध्ययन स्तर वृद्धी -**

या उपक्रमाची फलनिष्पत्ती म्हणजे अध्ययन स्तरात वाढ दिसून आली. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत घेतल्या गेलेल्या भाषा व गणित अध्ययन स्तर निश्चितीमध्ये वाढ दिसून आली जी खालील तक्त्यात व आलेखात दर्शवली आहे. एकूणच विषयाची रांगोळी कला एकात्मिक शिक्षण यातून शाळा, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना लाभ झालेला दिसून आला.

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये विद्यार्थ्यांची अध्ययन स्थिती जाणून घेण्यासाठी दर वर्षी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद व शिक्षण विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या मार्फत अध्ययन स्तर घेण्यात येतो. यामध्ये जि.प.प्रा.शा. गणोरी येथेही अध्ययन स्तर शैक्षणिक वर्ष 2021-22 घेण्यात आला होता यामध्ये खालील दिलेल्या चार्ट नुसार अध्ययन स्तर दिसून आला. इयत्ता 1ली च्या 37 उपस्थित विद्यार्थ्यांपैकी 14 (37.84 %) विद्यार्थ्यांना शब्द वाचता येत होते व 21 (29.73 %) विद्यार्थ्यांना बेरीज क्रिया करता येत होती. इयत्ता 2 री च्या 32 विद्यार्थ्यांपैकी 11 (34.38 %) विद्यार्थ्यांना उतारा वाचता येत होते व 12 (37.50 %) विद्यार्थ्यांना वजाबाकी क्रिया करता येत होती. इयत्ता 3 री च्या 42 विद्यार्थ्यांपैकी 23 (52.38 %) विद्यार्थ्यांना उतारा वाचता येत होते व 24 (54.76 %) विद्यार्थ्यांना गुणाकार क्रिया करता येत होती. इयत्ता 4 थी च्या 61 विद्यार्थ्यांपैकी 20 (32.79 %)


विद्यार्थ्यांना उतारा वाचता येत होते व 28 (45.90%) विद्यार्थ्यांना भागाकार क्रिया करता येत होती. अशा प्रकारे या वर्षी विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर कमी दिसून आला.


| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद व शिक्षण विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्ययन स्तर -2021-22 | | | भाषा | | | | | गणित | | | | | | |
| वर्ग | पट संख्या | उपस्थिती | प्रारंभिक स्तर | अक्षर स्तर | शब्द स्तर | वाक्य स्तर | उतारा वाचन स्तर | प्रारंभिक स्तर | अंक ओळख 1 ते 9 स्तर | संख्या ओळख स्तर | बेरीज स्तर | वजाबाकी स्तर | गुणाकार स्तर | भागाकार स्तर |
| 1 | 35 | 35 | 2 | 11 | 22 | | | 0 | 35 | 27 | 21 | | | |
| 2 | 44 | 44 | 1 | 3 | 4 | 8 | 28 | 0 | 44 | 42 | 40 | 37 | | |
| 3 | 35 | 35 | 0 | 2 | 5 | 4 | 24 | 0 | 35 | 31 | 33 | 31 | 24 | |
| 4 | 44 | 43 | 0 | 3 | 5 | 1 | 38 | 0 | 43 | 38 | 38 | 32 | 30 | 27 |
| एकूण | 158 | 157 | 3 | 19 | 36 | 13 | 90 | 0 | 157 | 138 | 132 | 100 | 54 | 27 |
| | % | 99.37 | 1.91 | 12.10 | 22.93 | 10.66 | 73.77 | 0.00 | 100.00 | 87.90 | 84.08 | 81.97 | 69.23 | 62.79 |

| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद व शिक्षण विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्ययन स्तर -2022-23 | | | भाषा | | | | | गणित | | | | | | |
| वर्ग | पट संख्या | उपस्थिती | प्रारंभिक स्तर | अक्षर स्तर | शब्द स्तर | वाक्य स्तर | उतारा वाचन स्तर | प्रारंभिक स्तर | अंक ओळख 1 ते 9 स्तर | संख्या ओळख स्तर | बेरीज स्तर | वजाबाकी स्तर | गुणाकार स्तर | भागाकार स्तर |
| 1 | 44 | 37 | 9 | 14 | 14 | 0 | 0 | 9 | 28 | 13 | 11 | 0 | | |
| 2 | 34 | 32 | 4 | 9 | 4 | 4 | 11 | 4 | 28 | 18 | 17 | 12 | | |
| 3 | 43 | 42 | 0 | 3 | 7 | 10 | 22 | 0 | 42 | 37 | 35 | 30 | 23 | |
| 4 | 61 | 61 | 0 | 7 | 14 | 20 | 20 | 0 | 61 | 30 | 50 | 28 | 28 | 28 |
| TOTAL | 182 | 172 | 13 | 33 | 39 | 34 | 53 | 13 | 159 | 98 | 113 | 70 | 51 | 28 |
| | % | 94.51 | 7.56 | 19.19 | 22.67 | 25.19 | 39.26 | 7.56 | 92.44 | 56.98 | 65.70 | 51.85 | 49.51 | 45.90 |

चालू शैक्षणिक वर्ष 2022-23 च्या अध्ययन स्तर मध्ये मागील वर्षीच्या अध्ययन स्तरामध्ये चांगली वाढ दिसून आली. इयत्ता 1ली च्या 35 विद्यार्थ्यांपैकी 22 (54.76 %) विद्यार्थ्यांना शब्द वाचता येत होते व 21 (54.76 %) विद्यार्थ्यांना बेरीज क्रिया करता येत होती. इयत्ता 2 री च्या 44 विद्यार्थ्यांपैकी 28 (54.76 %) विद्यार्थ्यांना उतारा वाचता येत होते व 21(54.76 %) विद्यार्थ्यांना वजाबाकी क्रिया करता येत होती. इयत्ता 3 री च्या 35 विद्यार्थ्यांपैकी 24 (54.76 %) विद्यार्थ्यांना उतारा वाचता येत होते व 24 (54.76 %) विद्यार्थ्यांना गुणाकार क्रिया करता येत होती. इयत्ता 4 थी च्या 43 विद्यार्थ्यांपैकी 38 (54.76 %) विद्यार्थ्यांना उतारा वाचता येत होते व 27 (54.76 %) विद्यार्थ्यांना भागाकार क्रिया करता येत होती.

शैक्षणिक वर्ष 2021-22 व शैक्षणिक वर्ष 2022-23या दोन्ही वर्षाच्या अध्ययन स्तराची तुलना केली असता **भाषा 32 % व गणिता मध्ये 27 % 27 सरासरी अध्ययन स्तरामध्ये वाढ दिसून आली. तसेच उपस्थिती मध्ये 94 % 94वरून 99 % वाढ दिसून आली. या वाढी मध्ये विषयाची रांगोळी या उपक्रमाचा मोलाचा वाटा आहे.**



**चिंतनात्मक प्रश्न**

1. आर्ट इंडिकेटेड लर्निंग कला एकात्मिक शिक्षण या संकल्पनेतून विद्यार्थी शिकू शकतात किंवा नाही हे आपले मत थोडक्यात मांडा.

2. सदर शाळेचे विद्यार्थी इयत्ता पहिली ते चौथीचे आहेत त्यामुळे त्यांना या उपक्रमातून यश मिळाले हा उपक्रम वरच्या वर्गांना म्हणजे पाचवी ते दहावीला उपयुक्त होईल किंवा नाही यावर आपले मुद्दे (2/3ओळीत) थोडक्यात मांडा

विषयाची रांगोळी या उपक्रमामध्ये मराठी व गणित या विषया बरोबरच परिसर अभ्यास व इंगजी सारख्या इतर विषयाच्या संबोध अधिक आकर्षक, आनंददायी व कृतियुक्त सहभागातून प्रभावीपणे स्पष्ट करता येतो. विद्यार्थी कलेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे अभिव्यक्त होतात. त्याच प्रमाणे खालीलप्रमाणे या मोड्यूलचा शालेय नेतृत्वास उपयोग करून घेता येईल.

- शंभर टक्के विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकून ठेवणे शक्य होईल.
- कला विषयाचा आधार घेऊन विषयांचे आकलन सहज व सुलभ होईल.
- विषयाची रांगोळी या कृतीमुळे विद्यार्थ्यांना सोय अध्ययनासाठी संधी निर्माण होईल.
- विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी या उपक्रमाचे सहाय्य होईल.
- विषयाची रांगोळी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होईल..
- वर्गातील चर्चेमध्ये विद्यार्थी उत्साहाने भाग घेऊ लागतील .
- विद्यार्थी अभिव्यक्त होऊ लागतील .

Art Integrated learning मध्ये शालेय नेतृत्वाला असेही करता येईल

कलांचे अन्य विषयासोबत एकात्मिकीकरण करणे म्हणजेच कला ही अध्ययन अध्यापन प्रक्रियेचा घटक बनणे होय. निष्ठा शिक्षक प्रशिक्षण घटक-3 कला एकात्मिक अध्ययन यात सविस्तरपणे याबाबत विवेचन करण्यात आले आहे.

जर अभ्यासक्रमाच्या केंद्रस्थानी कला असतील तर संकल्पना समजण्यास मदत होते. विविध विषयातील आशयाची तार्किक , विद्यार्थीकेंद्री आणि अर्थपूर्ण जोडणी करणे शक्य होते. कला केंद्रस्थानी असेल तर गणित, विज्ञान, समाजशास्त्र, व भाषा यासारख्या विषय आणि त्यातील अमूर्त संकल्पनांची परस्परांशी सांगड घालता येते या पद्धतीने घेतलेले शिक्षण सर्वांगीण आनंददायी, अनुभवप्रदान करणारे असते.

अभ्यासक्रमातील वेगवेगळे भाग शिकवण्याकरिता त्यासोबत कलेची सांगड घालणे म्हणजे कला एकात्मिक अध्ययन. यात तीनही विभागांवर ( बोधात्मक, मानसिक - शारीरिक आणि भावात्मक) एकत्रितपणे काम केले जाते.

1) विषयनिहाय घटकनिहाय चित्रे /रांगोळी काढणे.
2) यासाठी वर्गात वेगवेगळे संमिश्र मुला मुलींचे गट तयार करणे.
3) वर्गात किंवा आंतरवर्ग किंवा शाळास्तरावर स्पर्धा घेता येतील.
4) रांगोळी बरोबरच भित्तीपत्रके/कोलाज यावर असा उपक्रम घेता येईल.

5) भित्तीपत्रके/कोलाज/रांगोळया/चित्रे यावर सादरीकरणाची मुलांना संधी देता येईल ज्यातून अभिव्यक्त कौशल्य वाढविता येईल .
6) प्रात्यक्षिक स्तरावर कागदापासून विविध वस्तू, फुले, आकार तयार करुण्यातून आकार, प्रक्रिया, कारणमीमांसा समजते.त्यामुळे अशी संधी विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर देता येतील.

**NEP २०२० च्या अनुषंगाने या मोड्यूलचे महत्व –**

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे 21व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. या धोरणाचे ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाय योजना करणे हे आहे. हे धोरण प्रत्येक व्यक्तीच्या सृजन क्षमतेच्या विकासावर जास्त भर देते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भारतीय भाषा कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यात आलेले आहे. भारतामधील सर्व कला गुणांना वाव व संवर्धन विषयी या धोरणामध्ये नमूद केलेले आहे. रांगोळी हा कला प्रकार भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. याचाच उपयोग शाळा मुलांच्या शिकण्यासाठी व विषयातील संबोध अधिक प्रभावीपणे समजण्यासाठी कल्पकतेने करू शकतात.

या धोरणात अनुभवात्मक शिक्षण अंतर्गत 4.6 मध्ये नमूद केले आहे. सर्व स्तरावर अनुभवात्मक शिक्षणाचा अवलंब केला जाईल. ज्यात प्रत्येक विषयात मानक अध्यापन म्हणून प्रात्यक्षिक शिक्षण कला आणि खेळ यांचा समावेश असलेले शिक्षण व वेगवेगळया विषयातील संबंध शोधण्याचाही समावेश असेल. 4.7 नुसार कला एकात्मिक शिक्षण हा एक बहुअभ्यासक्रमीय अध्यापन दृष्टीकोन आहे, ज्यात विविध विषयाच्या संकल्पना शिकण्यासाठी आधार म्हणून वापर केला जातो. NEP २०२० अंतर्गत मुद्दा क्र. 22 मध्ये भारतीय कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन या अंतर्गत असे विश्लेषण केले आहे की भारतीय कला व संस्कृतीचा प्रचार देशाबरोबर व्यक्तीसाठी ही महत्त्वाचा आहे.ज्यातून वैयक्तिक सामाजिक कल्याणासाठी सांस्कृतिक जागरूकता आणि अभिव्यक्ती यांचे योगदान महत्त्वाचे आहे. 22.3 नुसार कला हे संस्कृतीची शिकवण देण्याचे प्रमुख माध्यम आहे. आकलनात्मक आणि सर्जनशील क्षमता वाढविण्यासाठी आणि वैयक्तिक आनंद वृद्धिंगत करण्यासाठी कला शिक्षणाच्या सर्व स्तरावर कलेचे शिक्षण दिले पाहिजे. म्हणूनच कला प्रकारांचा शिक्षणात समावेश झाल्यास विद्यार्थी विकास होण्यास मदत होईल, असे स्पष्टपणे NEP 2020 मध्ये नमूद करण्यात आले आहे.

**समारोप -**

सदर उपक्रम हा जि.प.प्रा.शा.,गणोरी,ता.फुलंब्री,जि.औरंगाबाद या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण करणारा ठरला. तसेच कला या विषयाच्या माध्यमातून गणित, मराठी, परिसरअभ्यास, कार्यानुभव व इंग्रजी या सर्व विषयांना जोडणारा ठरला. विद्यार्थी केंद्रित शिक्षणाला बळ दिले गेले. पालक शिक्षक विद्यार्थी यामध्ये आंतरक्रिया घडून येऊ लागली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील मुख्याध्यापिका श्रीमती. उत्कर्षा देशमुख. यांनी शिक्षक श्रीमती ए. एल.भस्मे, श्रीमती एस. एस. तिडके, श्रीमती बी. के. दशपुत्रे, श्रीमती आर. आर. जोशी व श्री.के. ए.पवार यांच्या सहकार्याने प्रभावीपणे राबविला. मोड्यूलच्या स्वरुपात सदर विषयाची रांगोळी हा उपक्रम इतर शाळांना ही उपयोगी ठरू शकतो. रांगोळी बरोबर चित्रकला, हस्तकला. अभिनय, गीत गायन, खेळ व इतर कला गुणाचा वापर करून अध्ययन अध्यापन अधिक परिणामकारक होऊ शकते व विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त कला गुणाच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्याची संधी यामुळे मिळू शकते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1) नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, जानेवारी 2016, संचालक मूवी प्राधिकरण पुणे
2) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
3) निष्ठा शिक्षक  प्रशिक्षण घटक संच
4) निपा नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावरील माहिती
5) http://ncsl.niepa.ac.in/
6) https://maa.ac.in/

| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| श्री.लक्ष्मण भिवसने | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| विषय साधन व्यक्ती | समन्वयक | संचालक |
| गट साधन केंद्र फुलंब्री, | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व |
| जि.औरंगाबाद | प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |